# दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,मुख्य कार्यालय,अमरावती

*राष्ट्रीय बँक पुरस्कृत* "डेअरी उद्योजकता विकास व्यवसाय" *योजने अंतर्गत (१० गाई म्हैशी खरेदी युनिट मॉडेल प्रस्ताव)*

कृषी प्रधान अर्थव्यवस्थेत दुग्ध व्यवसायाला विकासासाठी मानाचे स्थान आहे.हा व्यवसाय शेतक-यांना जोडधंदा म्हणून चांगले उत्पन्न मिळवून देतो.तसेच जादा प्रोटीनयुक्त वेगवेगळी दुग्ध उत्पादने देखील उपलब्ध होवू शकतात.अमरावती जिल्हयातील दुग्ध उत्पादनाची सद्यस्थिती लक्षांत घेता हया व्यवसायाला भरपूर वाव आहे व तसेच जिल्ह्याचा समावेश यापूर्वी दुध महापूर योजनेमध्ये नसल्यामुळे राष्ट्रीय बँक पुरस्कृत **डेअरी उद्योजकता विकास व्यवसाय** हया योजने अंतर्गत कर्ज वितरणास पात्र आहे.

**डेअरी उद्योजकता विकास व्यवसाय** हा पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाने राष्ट्रीय बँकेकडे ठेवलेला निधी असून त्या अंतर्गत लाभार्थिंना प्रकल्प खर्चाच्या २५% किंवा एससी/एसटी करिता ३३.३३ % अनुदान मिळण्याची सोय आहे.व लाभार्थीला स्वगुंतवणूक १०% करावयाची असून इतर रक्कम बँक कर्ज स्वरुपात देणार आहे.

सदर निधी अंतर्गत बँकेने गाई/म्हैशी खरेदीकरीता कर्ज वितरणाचा निर्णय घेतलेला असुन त्यासाठी खालील तपशिलासह मॉडेल प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

१) योजने अंतर्गत १० गाई/म्हैशी संगोपन व्यवसाय उभारणीसाठी प्रकल्प खर्चाची महत्तम मर्यादा रु.५०००००/- (पाच लाख) राहील, त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | प्रति जनावराचा दर (रुपये) | १० गाई/म्हैस करीता लागणारे एकूण रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | १० जनावरे खरेदी (सुधारीत जातीची म्हैस किंवा गाय) | ३००००/- | ३०००००/- |
| ०२ | गोठा बांधकाम () स्टोअरसह १० जनावरांकरीता | ११००० | ११००००/- |
| ०३ | वाहतुक खर्च | १००० | १००००/- |
| ०४ | विमा खर्च १ वर्षाचा १० जनावरांकरीता ४%विमा+वाहतुक विमा+विमा+विमा सेवा शुल्क (१०.५०%) | - | १५०००/- |
| ०५ | चारा ,खाद्य,पाणी, भांडी औषधोपचार व इतर खर्च | ६५००/- | ६५०००/- |
| | एकूण :- | | ५०००००/- |

२) मी ----------------------------------- सेवा सह.संस्था म.र.नं.---------- या संस्थेचा/बँकेचे थेट कर्ज पुरवठया अंतर्गत-------- शाखेचा नियमित कर्ज परतफेड करणारा सभासद असून माझेकडे मौजे---------------- ता.-----------येथील स्वमालकीची स.नं./गट नं.--------मधिल एकूण------एकर जमीन असून त्यावर कुठल्याही बँकेचा बोजा नाही.सदरचे शेतीपैकी ----------- एकर क्षेत्र ओलीतासाठी असुन ---------- द्वारे सिंचनाची सोय उपलब्ध आहे.त्यावर --------- हॉ.पॉ. मोटरपंप कार्यरत आहे.मला दुग्ध व्यवसायाबाबत पुरेसे ज्ञान असुन व्यावसायिक पध्दतीने दुग्ध व्यवसाय करण्याची मला आवड आहे.माझे--------- गावांत ----------- दुग्ध उत्पादक सह.संस्था कार्यरत असुन मी हया संस्थेचा देखील सभासद आहे. आमचे गावामध्ये संस्थेला पुरवठा करण्यांत आलेले दुध नियमितपणे

जिल्हयाचे ठिकाणी नेण्याची सोय जिल्हा दुध संघ/महाराष्ट्र शासनातर्फे उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.त्यामुळे सदरची गाई/म्हैशी संगोपन व्यवसाय मी------------ गावामध्ये करणार आहे.------------ दुध उत्पादक संस्थेचा आवश्यक दाखला तसेच संबंधित दुध उत्पादक संस्थेकडुन जिल्हा दुध उत्पादक संघ, दुध विकत घेत असलेबाबतचा दाखला सोबत जोडलेला आहे.

३) **योजना राबविण्याचे उद्देश :-** योजना राबविण्याचे उद्देश खालीलप्रमाणे.

अ) व्यावसायिक पध्दतीने दुग्धपालनाचा धंदा स्विकारुन अतिरिक्त उत्पन्न वाढवून स्वतःची आर्थिक परिस्थिती सुदृढ करणे.

ब) जिल्हयांतील दुध उत्पादक वाढविणे व तसेच दुधापासून तयार होणारी वेगवेगळी दुग्ध उत्पादनाचे वाढीस चालना देणे.

क) स्वतःचे शेताकरीता लागणा-या खताची गरज भागविणे.

ड) गावाचे तथा जिल्ह्याचे विकासांत भर टाकणे.

४) हया व्यवसायासाठी लागणा-या सोयींची उपलब्धता.

अ) **विज व पिण्याचे पाण्याची सोय :-** माझेकडील ------------ क्षेत्र सिंचनाखाली असल्यामुळे विज व पाण्याची सोय अस्तित्वात आहे .

ब) **हिरव्या व वाळल्या चा-याची उपलब्धता :-** सिंचनाची सोय उपलब्ध असल्यामुळे जनावरांसाठी लागणारा चा-याची लागवड स्वतःचे शेतावरच करण्यांत येईल व तसेच वाळला चारा माझे ------------------ गावाचे परिसरात उपलब्ध आहे.----------- तालुक्यापासून गावाचे अंतर-------- कि.मी.असून तेथील बाजार पेठेत ढेप,सरकी उपलब्ध होऊ शकते.अन्यथा गावापासून जिल्हा मुख्यालय----------- कि.मी.------- अंतरावर असून तेथून आवश्यक बाबींची खरेदी केल्या जाऊ शकेल.

क) **पशुवैद्यकिय सेवा :-** पशुवैद्यकिय सेवा हि------------ येथे उपलब्ध आहे.सदरचे ठिकाण माझे गावापासून -------- अंतरावर आहे.तसेच कृत्रिम रेतन केंद्र ---------- येथे उपलब्ध आहे.

ड) जिल्हयाबाहेरील अधिकृत बाजारातून मी चांगल्या जातीची जनावरे खरेदी करणार असुन त्यासाठी संस्था/बँकेचे दिशानिर्देशाप्रमाणे खरेदी करण्याबाबत माझी काहीहरकत राहणार नाही.

इ) **शेड उभारणीसाठी जागेची व साहित्याची उपलब्धता** :- मी जनावरांसाठी गोठा (शेड)---- ------------- हया ठिकाणी उभारणार असून तेथै शेड उभारणीसाठी स्वमालकीची पुरेशी जागा उपलब्ध आहे. १० गायींसाठी मला ६०० चौ.फुट शेडची उभारणी करावी लागणार असुन ते बँकेने पुरविलेलया नकाशाप्रमाणे करण्यास माझी अनुमती राहील.शेड बांधकामासाठी आवश्यक साहित्य शेड उभारणीस्थळी उपलब्ध करुन शेडचे बांधकाम बँकेने निर्धारित केलेल्या डिझाईननुसार व कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

फ) **जनावरांची उपलब्धता व निवड :-** गायी/म्हैशी खरेदी करतांना जास्तीत जास्त दुध उत्पादीत करणा-या जनावरांची निवड पशुवैद्यकाच्या सहाय्याने करण्यात येईल व तसेच पहिल्या अथवा दुस-या बेंतातील शक्यतोवर गाभण जनावरांची निवड करण्यात येईल.व योजनेमध्ये निर्धारित केलेल्या अधिकृत समितीचे संमतीनेच जनावरांची खरेदी करण्यात येईल.

५) **सदरच्या व्यवसायाठी लागणारे अर्थसहाय्य** :- व्यावसायिक पध्दतीने दुग्ध व्यवसाय करण्यासाठी शेड उभारणी,जनावरे खरेदी,चारा लागवड व ईतर अनुषंगिक बाबींसाठी --------------- कर्जाची आवश्यकता भासणार असुन सदरचे अर्थसहाय्य ----------- सेवा सह.संस्था/बँकेमार्फत थेट स्वरुपांत घेण्यास मी इच्छुक आहे.त्यासाठी आवश्यक बाबींची पुर्तता करण्यास तसेच योजना खर्चाचे १० टक्के प्रमाणे स्वगुंतवणूक करण्याची माझी तयारी राहील.

६) **कर्जासाठी आवश्यक तारण :-** माझी स्वमालकीची ----------- जमीन मी संस्था तथा बँकेच्या तारणास देण्यास तयार असून त्यावर प्रथम हक्काचा बोजा नोंदविण्यास माझी अनुमती राहील.तसेच शेड,साहीत्य व जनावरे कर्ज रक्कमेची परतफेड होईपावेतो बँकेच्या नजरगहाणात राहतील.

७) **व्याजदर :-** सदरचे कर्जावर संस्था/बँकेतर्फे नियमाप्रमाणे आकारणार असलेल्या---------- द.सा.द.शे.व्याजाचा दर मला मान्य राहील व हयामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार संस्था तथा बँकेस प्राप्त राहील.त्याबाबत माझी कुठलीही तक्रार राहणार नाही.

८) **परतफेडीचा कालावधी :-** सदरचे कर्जाचा परतफेडीचा कालावधी सहामाही किस्ती प्रमाणे १० किस्तीनुसार ५ वर्षाचा असेल मात्र मासिक किस्तीमध्ये परतफेड करण्यास मी वचनबध्द राहील.

९) संस्था/बँकेमार्फत योजनेनुसार मंजुर केलेल्या कर्जमर्यादा रकमेची उचल करणेबाबत असलेली अट मला मान्य असुन हया अटीनुसारच मी कर्ज हप्त्याची मागणी करेन हयाबाबत माझी काहीही हरकत राहणार नाही.

१०) राष्ट्रीय बँकेकडुन प्रकल्प खर्चाच्या २५% अनदान सर्व सामान्य सभासदांकरिता व ३३.३३ % एससी/एसटी सभासदांकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.सदरची रक्कम बँकेत रिझर्व फंड अनुदान खाती ३ वर्षाकरिता जमा राहील. त्यावर व्याज आकारणी करावयाची नाही.व सतत ३ वर्ष नियमित परतफेड केल्यास अनुदान रक्कम कर्ज खाती जमा करण्यात येईल.

११) सभासदास एकुण प्रकल्प खर्चाचे कमीत कमी ४०% कर्जाची बँकेकडुन कर्ज उचल करावी लागेल व इतर खर्च स्वत: केल्यास व प्रकल्प पुर्ण झाल्यानंतरच अनुदान रक्कम ३ वर्षानंतर कर्जात वळती करणेत येईल.

योजनेसाठी बँक/संस्था यांनी घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तीचे मी वाचन केलेले असून त्याप्रमाणे पूर्तता करण्याची माझी जबाबदारी राहील व कळविण्यांत आलेल्या तथा वेळोवेळी बदललेल्या अटी व शर्ती मला बंधनकारक राहतील.नियमानुसार मी सर्व आवश्यक कागदपत्रे जसे :- ७/१२ चा उतारा, ८(अ) गावनमुना ६,इकरार दुग्ध संस्थेचा दाखला,कार्यक्षेत्रांसाठी बँकांचे नाहरकत प्रमाणपत्र इ.बाबींची पूर्तता केलेली असुन मला १० गाई/म्हैशीचे युनिटसाठी सोबतचे प्रकल्प खर्चानुसार रु.------------------कर्ज रक्कम मंजूर करावी ही विनंती.

स्थळ :- -----------------

दिनांक :- -----------------

**सभासदाची सही.**